नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १६/०६/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## दुखापत

**पो.स्टे. काटोल** :– अंर्तगत १८ कि.मी. अंतरावरील तपनी शिवार येथे दिनांक १५/०६/२२ चे ०८.०० वा. चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दौलतराव नारायनराव वाघमारे वय ९० वर्ष, रा. तपनी व आरोपी क्र. १) सुशीला बारई, २) धनराज बारई व ३) ज्ञानेश्वर बारई तिन्ही रा. साावरगाव ता. नरखेड यांची शेतीला शेती लागुन असुन यांचात शेतीचा वाद असुन कोर्टात शेतीविषयी केस सुरू आहे. यातील आरोपी हे शेतात गेले व पेरणी करू लागले तेव्हा फिर्यादी हे म्हणाले की, ‘अजुन शेतीचा निकाल लागला नाही निकाल लागु दया, नंतर ज्यांचे साईडने जाईल तो पेरल’ असे म्हटले असता आरोपीतांनी फिर्यादीला लाकडी काठीने तळ हातावर तळ पायावार पोटरीवर मारले त्यामुळे फिर्यादीच्या छातीला मार लागला आहे तसेच आरोपी क्र. ३ याने शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक अविनाश बाहेकर मो.नं. ९३७३७४०८१४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील रामनगर कन्हान दिनांक १०/०६/२०२२ चे १५.३० वा. ते दिनांक १२/०६/२०२२ चे १६.०० वा. पुर्वी **निराधार स्वप्निल उमाशंकर गजभिये (मृतक), वय ३३ वर्ष रा. राम नगर कन्हान** याने अज्ञात कारणाने विषारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचार कामी अज्ञात ईसमानी प्रथम पीएचसी कन्हान त्यानंतर रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे दिनांक १०/०६/२२ चे रात्री ०८/३० वा. भरती करण्यात आले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन दि १२/०६/२२ रोज दुपारी ०४.०० वा मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी पोलिस नाईक मंगेश सोनटक्के यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मुकेश रामेलवार मो.क्र. ९३५९८१२४६८ हे करीत आहेत.

**२) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा नांदोरी येथे दिनांक २४/०५/२०२२ चे २२.०० वा. ते २२.३० वा. **अनिल चुडामन पिंगे (मृतक),वय ३९ वर्ष रा. नांदोरी तह. सावनेर जि. नागपुर** यांनी अज्ञात कारणावरुन कोणतेतरी विषारी औषध प्राशान केले. त्यांना उपचाराकामी प्रथम ग्रामीण रुग्णालय सावनेर व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासून दि. १४/०६/२२ चे दुपारी ०३.३० वाजता मृत घोषीत केले. मृतकचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अमर झिने मो.नं. ८१८०९७५१२५ हे करीत आहेत.

## गळफास लावून मृत्यु

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत मौजा पानउबाडी शिवार ता. कळमेश्वर येथे दिनांक १५/०६/२०२२ चे १६:३० वा. दरम्यान फिर्यादीचे वडील **उकंडराव जंगलुजी वरठी(मृतक), वय ५४ वर्ष, रा. वार्ड क्र. १ पानउबाडी** यांनी स्वत: चे शेतातील धूऱ्यावरील कडुलिंबाचे झाडावर कापडाचे दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आशिष जंगलुजी वरठी, वय वर्ष, रा. वार्ड क्र. १ पानउबाडी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार देवशंकर गुप्ता मो.क्र. ९५११२४७२६१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील तांदुळवाणी शिवार येथे दिनांक १५/०६/२०२२ चे १२:३० वा. ते ३०.३० वा. दरम्यान **आशिष संजय भोंगाडे (मृतक), वय २३ वर्ष, रा बाबुलखेडा** हा दारू पिण्याच्या सवईचा होता. तो हा काही कामधंदा बरोबर करीत नव्हता त्याने तांदुळवाणी शिवारात कोलार नदीजवळ ज्ञानेश्वर शोनकुसरे यांच्या शेताजवळ बाबळीच्या झाडाला स्वताच्या दुपटयाने गळफास घेवुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्याम संजय भोंगाडे, वय २६ वर्ष, रा. बाबुलखेडा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार निलेश बिजवाड मो.क्र. ८८०६६६६४६९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**